पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६९०/२०१४
दिनांक : १६/०८/२०१४

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची विशेष सभा दिनांक **२०/०८/२०१४** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची विशेष सभा बुधवार दिनांक **२०/०८/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.विधी समिती विशेष सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ०३

दिनांक : २०/०८/२०१४ वेळ : दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची विशेष सभा बुधवार दिनांक **२०/०८/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**विषय क्र.१)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ मधील प्रस्तावात नमुद प्रमाणे परिशिष्ट १ ते ६ मधील सेवा भरती करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती, अधिकारी व कर्मचारी यांच्या पदासाठीची शैक्षणिक अर्हता, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विभागीय परीक्षा नियम, पदोन्नतीसाठी एकत्रित संवर्ग, विविध पदांची पदोन्नती साखळी, अनुसरावयाचे महत्वाचे शासन निर्णयाची यादी यांस महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) (अ) व (ब) अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०८/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** महानगरपालिकेतील कामकाजासाठी काही नवीन विभाग सुरु करणे त्यासाठी आवश्यक असणा-या गट अ ते ड मधील काही संवर्गाच्या पदसंख्येत वाढ करणे, आवश्यक तेथे नवीन पदांची निर्मिती करणे आवश्यक असल्याने काही संवर्गाच्या पदसंख्येत वाढ सुचविली आहे. तर काही नवीन पदांची निर्मिती करुन त्यांची शैक्षणिक अर्हता, पदोन्नती सोपान, वेतनश्रेणी व पदसंख्या प्रस्तावित करण्यात आलेली आहे. यामुळे महापालिका आस्थापना खर्चात वार्षिक ८९.८९ कोटीने वाढ होणार आहे. सन २०१२-१३ या वर्षाचा आस्थापना खर्चाची आऊटसोर्सिंगच्या खर्चासह टक्केवारी २३.६१ टक्के आहे. सन २०१३-१४ मधील महसुली उत्पन्न १९२६ कोटी असून आस्थापना खर्च ५०७.६२ कोटी इतका अपेक्षित आहे. आस्थापना खर्चाची टक्केवारी २७.०७ टक्के आहे. नवीन पदांची निर्मिती व पदसंखेत वाढ केल्याने ८९.८९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एकूण आस्थापना खर्च ५९७.५१ कोटी इतका होईल. हा आस्थापना खर्च सन २०१३-१४ च्या महसूली उत्पन्नाच्या ३१ टक्के इतका होईल. प्रस्तावात नमुद प्रपत्र ‘ब ’ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यकता नसणारी अथवा आऊटसोर्सिंगद्वारे कामकाज करुन घेता येऊ शकणारी काही

अनावश्यक पदे व्यपगत/निरस्त करणे आवश्यक आहे. प्रस्तावात नमुद प्रपत्र 'ब' नुसार सदर पदे निरस्त करण्यास तसेच प्रपत्र 'अ' नुसार आवश्यक पदांच्या संख्येत वाढ करण्यास व नवीन पदांच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ (४) अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०८/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.३)** मनपाचे स्थापत्य क मुख्यालयाकडील प्रभाग क्र.१०१ फुगेवाडी मधील लोकमान्य टिळक शाळेच्या जुन्या इमारतीत फेरफार करुन नविन शाळा इमारत बांधणे व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणेकामी ( सुधारित प्रशासकीय मान्यता) येणा-या र.रु.२,४५,८४,२५९/- ( अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी पंचेचाळीस लाख चौ-याऐंशी हजार दोनशे एकोणसाठ फक्त ) चे पुर्वगनणपत्रकास व त्या प्रमाणे काम करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०८/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.४)** मा. अ प्रभाग समिती ठराव क्रमांक ८ दिनांक १८/०२/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अप्पूघर शेजारील समर्थनगरी, आशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच दत्तनगर भागातील नागरीक पालिका हद्दीबाहेरील असले तरी महापालिकेने त्यांच्या पाण्याची सोय केलेली आहे. पण त्याचा दर १००० लिटरला ३५/- रु. असा आहे. परंतु सिध्दीविनायक नगरी हा भाग सुध्दा मनपा हद्दीबाहेर आहे पण तेथील पाण्याचा दर १००० लिटरला २.५० रु. महापालिकेच्या अटी शर्ती नुसार आहे. याबाबत मा.विधी समिती ठराव क्र.९३४ दिनांक ०३/०४/२००६ अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस केलेली असून मा.महापालिका सभा ठराव क्र. ५०८ दि.२४/०४/२००६ अन्वये सिध्दीविनायक व श्रीनगरी येथील नागरिकांना मनपा हद्दीतील निवासी दराप्रमाणे पाणीबील आकारणेस मान्यता देणेत आलेली आहे. तरी अप्पूघर शेजारील समर्थनगरी, आशिर्वाद नगर, परमार कॉम्प्लेक्स येथील तसेच दत्तनगर भागातील रहिवाशांना सिध्दीविनायक नगरी व श्रीनगरी येथील मनपा हद्दीतील निवासी दराप्रमाणे पाणीबील आकारणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक २०/०८/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.५)** देहू आळंदी या ३० मी. रुंदीच्या रस्त्याची सुमारे १३ कि.मी.मनपा हद्दीमध्ये लांबी आहे. देहू गाव ग्रामपंचायत हद्दीमध्ये सुमारे १.६०० कि.मी. तसेच आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये ५८० मी. लांबीचा रस्ता येतो. सदर रस्ता विकसित केल्यानंतर देहू ते आळंदी प्रवास करणा-या वारक-यांची

सोय होणार आहे. सद्या सदर रस्त्याचे मजबूतीकरण व रुंदीकरणाचे कामामधील काही उर्वरित कामे करणे बाकी आहेत. देहू आळंदी रस्त्याचे साखळी क्र.०/०० ते ८/२५० कि.मी. मधील रस्ता रुंदीकरण व मजबूतीकरण करणे अंतर्गत फूटपाथ बांधणे, पावसाळी पाण्याच्या पाईप लाईन टाकणे, पाणी पुरवठा व जलनि:सारणासाठी मोठया व्यासाच्या लाईन टाकणे, रस्ता दुभाजक बांधणे इ. कामे करणे आवश्यक आहे. सदर कामे IRC च्या मानांकाप्रमाणे करणेत येणार आहे. सदर उर्वरित कामे करणेसाठी मनपाच्या चालू प्रचलित दरसूची २०१२-१३ नुसार अंदाजपत्रक हे सदर कामाचे तांत्रिक सल्लागार मे.पेव्हटेक कन्सल्टंट यांनी तयार केले असून त्यांची अंदाजपत्रकीय र.रु.६०,०८,४६,३८७/- इतकी आहे. सदर काम करणेसाठी मनपाच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षावर अ.नं.८७ पानांक २३ वर र.रु.१०,००,००,०००/- तरतुद केली असल्याने सदरचे काम करणेकामी येणा-या र.रु.६०,०८,४६,३८७/- (अक्षरी र.रु.साठ कोटी आठ लाख सेहेचाळीस हजार तिनशे सत्याऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक २०/०८/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.६)** प्रभाग क्र.५ मध्ये अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन व जे.सी.बी. पुरविणेकामी येणा-या अंदाजे र.रु.१७,००,२४०/- (अक्षरी र.रु. सतरा लाख दोनशे चाळीस फक्त) चे खर्चाचे पुर्वगणनपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक २०/०८/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.७)** मा.महापालिका सभेच्या दिनांक २०/०५/२०१४ च्या सभेतील ठराव क्रमांक ४७९ नुसार महानगरपालिकेच्या संपूर्ण अंदाजपत्रकास अंदाजपत्रकीय रकमेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु ब क्षेत्रीय कार्यालय पाणीपुरवठा विभागातील प्रस्तावात नमुद प्रपत्रातील कामांचे पुढे अंदाजपत्रकीय रक्कम छापण्यात आलेली नसल्याने या कामांना प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावा सोबतचे प्रपत्रात नमुदप्रमाणे कामांचे नावापुढे दर्शविणेत आलेल्या अंदाजपत्रकीय रकमेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.(कामाची अंदाजपत्रकीय एकूण र.रु.२,९३,००,०००/-)(सन २०१४-१५ चा अंदाज र.रु.१,७९,००,०००/-)

**विषय क्र.८)** स्थापत्य विभागातील कार्यकारी अभियंता पदाच्या रिक्त जागांवर सध्याच्या कार्यकारी अभियंत्यांना अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. कामकाजाच्या सोईच्यादृष्टीने उपअभियंता स्थापत्य पदावरील खालील सेवाजेष्ठ अभियंत्यांना १) श्री.औंभासे प्रमोद सुधाकर, २) श्री.गायकवाड जीवन कृष्णा, ३) श्री.फारुक शेख, ४) श्री.सोनवणे डी.एस. यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणे, कार्यकारी अभियंता पदास शासनाची मंजूरी प्रलंबित असल्यास शासनाची मंजूरी मिळेपर्यंत वरील सेवाजेष्ठ उपअभियंत्यांस कार्यकारी अभियंता पदाचा पदभार देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.९)** महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामधील इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य व पाणीपुरवठा विभागातील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.७०९२ दि.१७/०६/२०१४ अन्वये मान्यता मिळाली आहे. प्रस्तावात नमुद कामांना सुधारित तरतूदीनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे. (सुधारित प्रशासकीय मान्यता र.रु.२८,५०,०००/-)



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६९०/२०१४
दिनांक : १६/०८/२०१४ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.